## मुफ्ती फझैलुर रहेमान हिलाल उस्मानी यांचा दहशतवादासंबंधीचा फतवा

(सिटीझन्स फॉर जस्टिस अँड पीस, मुस्लिम फॉर सेक्युलर डेमॉक्रसी आणी मुंबईतील इतर संस्था यानी दिनांक २७ जुलै २००६ रोजी संयुक्तरित्या आयोजित केलेल्या सभेत व्यक्तिशः जाहीर केलेला फतवा)

नितांत दयावान व नितांत क्षमाशील अल्लाहच्या नावे

इस्लामी जिहाद आणि दहशतवाद यात जमीन आस्मानचे अंतर आहे. धर्मनिष्ठ व्यक्तीने (मोमिन) अल्लाहने दाखवून दिलेल्या मार्गाने, उदात्त व पवित्र ध्येयासाठी आत्मबलिदान करणे हा इस्लाम मधील जिहादच्या संकल्पनेचा अर्थ आहे. अल्लाहने अपल्या करूणेने व क्षमाशीलतेने दिलेल्या अभिव्यक्तीच्या व श्रध्देच्या स्वातंत्र्याचा उपभोग घेता यावा म्हणून गुलामगिरीच्या शृंखलांतून इतरांना मुक्त करणे हे जिहादचे उदिष्ट असले पाहिजे. चिरंतन शांती व सामाजिक सुरक्षितता यांच्या परिपूर्ततेसाठी जिहादचा साधन म्हणून वापर झाला पाहिजे.

दहशतवादाचा अर्थ याच्या नेमका विरुध्द आहे. भितीचे व दहशतीचे वातावरण निर्माण करुन, लोकांचा निर्भयपणे जगण्याचा व मुक्तपणे वावरण्याचा हक्क हिरावून घेणे, हा दहशतवादाचा हेतू असतो.

दुसऱ्या शब्दात,

लोकांच्या मुलभूत हक्कांचे रक्षण करणे हे जिहादचे उदिष्ट असते तर लोकांचे हे हक्क व स्वातंत्र्य हिरावून घेणे हे दहशतवादाचे लक्ष्य असते.

प्रत्येक व्यक्तीचे जीवन अमूल्य असते. एका व्यक्तीला मारणे म्हणजे संपूर्ण मानवजातीची हत्या करणे, अशी इस्लामची धारणा असते. या उलट निरपराध व असहाय्य माणसांच्या प्राणांशी जीवघेणा खेळ खेळणे, हा दहशतवादाचा हेतू असतो. इतर समाज व्यवस्थांप्रमाणेच इस्लाममध्येही दहशतवाद हा अधम आणि तिरस्कारणीय गुन्हा आहे.

प्रेमात अणि युध्दात सर्व क्षम्य असते, असे बऱ्याचदा म्हटले जाते, परंतु इस्लाममध्ये युध्दजन्य परिस्थितीत ही मानवी सुसंस्कृतपणाच्या मर्यादांचे उल्लंघन करण्यास सख्त मनाई आहे. युध्दासंबंधीची आचार संहिता निर्माण करून, अत्यावश्यक असल्यामुळेच रुग्णावर जशी शस्त्रक्रिया केली जाते तसेच केवळ अपरिहार्य परिस्थितीतच केलेले युध्द धर्ममान्य असते, असा सिध्दांत इस्लामने जगासमोर मांडला आहे म्हणून युध्द काळात दुसऱ्यांच्या प्रार्थना स्थळांवर हल्ले करणे , निरपराध नागरिकांना मारणे किंवा रुग्णालयांवर हल्ले करणे इस्लाममध्ये निषिध्द मानले आहे. शेतातील उभी पिके नष्ट करणे, वारेमाप वृक्षतोड करणे, पाणी पुरवठयाच्या स्त्रोतात विष कालवणे किंवा वातावरण दूषित करणे या गोष्टी प्रतिबंधित मानल्या आाहेत.

दहशतवादाचे समूळ उच्चाटन व्हावे म्हणून किंवा दहशतवादाला समाज जीवनात मुळातच स्थान मिळू नये म्हणून न्याय व शांततावादी समाज व्यवस्था निर्माण करणे हे इस्लामचे उदिष्ट आहे म्हणूनच जगातील सर्व संवेदनशील लोकांनी पुढे येऊन मानवजातीला दहशतवादाच्या शापातून मुक्त करण्यासाठी नेक व न्याय समाज व्यवस्था निर्माण करण्याचे कर्तव्य भावनेने प्रयत्न केले पाहिजेत.

मुफ्ती फझैलुर रहेमान हिलाल उस्मानी, दारुल उलुम देवबंद, पंजाबचे मुख्य मुफ्ती

ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचे संस्थापक सदस्य आणि कार्यकारी समिती सदस्य
ऑल इंडिया मुस्लिम मजलिस मुशावरतचे कार्यकारिणी सदस्य
आला इंडिया मिली कौंसिल सदस्य
अलिगढ मुस्लिम विदयापिठाचे विधीसभेचे सदस्य
दारुस् सलाम इस्लामिक सेंटर, मालेर कोटला, पंजाब